PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Karav Tas Bharav
Year: 1975

Song: Tujhya Kaljachya Ghadyalat
Lyricist: G. D. Madgulkar

टिक टिक टिक टिक टिक
टिक टिक टिक टिक
तुझ्या काळजाच्या घडयाळात
किती वाजलं
हो तुझ्या काळजाच्या घडयाळात
किती वाजलं
बाई बाई किती वाजलं
काय सांगू रातीचं किती वाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
झाली मध्यान रात गं बाई
अजून रायाचा पत्त्या नाही
झाली मध्यान रात गं बाई
अजून रायाचा पत्त्या नाही
वाराबी मेला फिरकनां अन्
घामानं अंग माझं लई भिजलं
वाराबी मेला फिरकनां अन्
घामानं अंग माझं लई भिजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
हिच्या काळजाच्या घडयाळात बारा वाजलं
हिच्या काळजाच्या घडयाळात बारा वाजलं
बाई बाई बारा वाजलं

काटा सरकत जाई पुढं
डाव्या डोळयाची पापणी उडं
काटा सरकत जाई पुढंननन
डाव्या डोळयाची पापणी उडं
दारं खिडक्या बंद असोनी
दारं खिडक्या बंद असोनी
कोन्यात कोनतरी कुजबुजलं
बाई बाई कुजबुजलं

काय सांगू रातीचं बारा वाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
हिच्या काळजाच्या घडयाळात बारा वाजलं
हिच्या काळजाच्या घडयाळात बारा वाजलं
बाई बाई बारा वाजलं

चोर कोन्यात होता उभा
त्यानं माझ्यावर धरला दबा
चोर कोन्यात होता उभा
त्यानं माझ्यावर धरला दबा
भिऊन सख्याला मिठी मारली
बघून त्याला माझं डोळं लाजलं
भिऊन सख्याला मिठी मारली
बघून त्याला माझं डोळं लाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं
काय सांगू रातीचं बारा वाजलं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*